ठाणे

REFBK-0024040

REFBK-0024040

# आभास

उषा मेहता

# आभास

आभास
चेतश्री प्रकाशन
प्रथम आवृत्ती १९८३

© उषा मेहता
१६-२७ शिवाजी पार्क,
मुंबई-४०० ०२८.

प्रकाशिका
सौ. यशोदा सोनार
चेतश्री प्रकाशन,
देशमुख चाळ,
अंमळनेर

मुखपृष्ठ
जुईग्राफिक्स

मुद्रक–नारायण सावंत
स्वस्तिक प्रिन्टर्स,
भांडूप, मुंबई–७८

मूल्य–रुपये वीस

" ABHAS "
(Marathi Poetry)
Usha Mehta.

चेतश्री प्रकाशन

# आभास

REFBK-0024040
REFBK-0024040

उषा मेहता

प्रमिला दंडवते आणि
गौरी देशपांडे यांना

अनुक्रम

तसं ९
मरणमिठी १०
पाऊस येतोय हळुवार ११
डोंगरगीत १२
नसेलच जर बोलायचं तर १३
घनव्याकुळ रे प्रणयाची १४
बाकी १५
क्षितिजापलिकडेपर्यंत १६
गाणे १७
मनामनांची जुळणी १८
तुझ्या माझ्या डोळ्यांच्या भेटींच्या वाटा १९
तहान २०
केविलवाणे ... २१
दूरची पडशाळा २२
ओहोट २३
चांदण्यात वीज चमकावी २४
अस्पर्श २५
ताण २६
वाघ २७
मन २८
इंटरप्रीटर २९
वसंत ३०
भिंत ३१
मन वैरी ३२

अंधार ३३
परतीची वाट ३४
किती किती ३५
माझ्या मना ३६
वेगळीच ३७
दिल्या घेतल्या शिवाय ३८
अंतिम सत्य ४०
तिनं एका बाळाला जन्माला घातलं तेव्हा ४१
त्रिकालाबाधित ४२
माझ्या चिमण्या ४३
वादळ ४४
लाटांवर हेलावून येतात ४५
सुकत आलेल्या तळ्यात ४६
शहारा ४७
ते त्या वेळचं सोळाव्यातलं ४८
वाऱ्यानं पिंजलेल्या संध्याकाळी ४९
प्राक्तन ५०
प्रवास ५१
फुलत्या निखाऱ्यासारखे... ५२
वहात्या पाण्यावर ५३
कातरवेळी ५४
मानसचित्रे ५५
शत्रुत्व ५६
मंत्रबद्ध शब्द ५७

आकांताची पिंजण ५८
स्वप्न ६०
काटे ६१
डोळे ६२
काले बादल ६४
तुटका पाऊस ६५
झाडावरच टांगलेल्या काळजाचा घड ६६
फुलांसाठी . . . ६७
न्याव ६८
शाम की बेला ७०
ऊन ७१
अनोळख ७२
या चांदण्यात ७४
एक आपण असतो ७६
स्वीकार ७७
सनातन शहाणपण ७८
मैत्रिणी ग ८०
आभासराई ८२
अंतरंग ८५

पूर्वप्रसिद्धी
सत्यकथा, नवयुग, युगवाणी, पूर्वा, अभिरुची, स्त्री

... ग्रंथसंग्रहालय ठाणे
२४९२
२४०४०
काव्य ३११११५३
... शाखा (स्थळ प्रत)

## तसं

तसं
तसं काही नवीन नाहीच
तर उदाहरणार्थ हा पाऊस
ओळख असून ती नाकारणारा, सूक्ष्म रेषांचा, तिरका.
ते डोंगर
अधिकच जांभळे आणखीन् गहिरे, ढग मिरवते, स्वप्निल.
आणि मग ही झाडं
काही पाऊस झेलणारी, शहारून, तृप्तीत बेहोष तेजाळणारी
काही पाऊस गाळणारी, मूक मिटणारी.
गवत बाभडे कुठेही तरारतेच
नवीन
फक्त नव्यानं होणारी घालमेल
पाऊस जुनाच, तसाच, उगाच

## मरणमिठी

मोगरकळ्या पिळवटून सांडलेलं उत्कट चांदणं...
भासआभासांनी भारलेला हा उभा आसमंत चेटकी
विचित्रपणे हलत रहाणाऱ्या निगूढ सावल्या
भूतभविष्याचे संदर्भ अजिबात हरवलेल्या
काळ्याभोर डोहात बुडत...बुडत...जाणाऱ्या

मोगरकळ्या पिळवटून सांडलेलं उत्कट चांदणं...
भास आभासांनी भारलेला हा उभा आसमंत चेटकी
गूढ स्वप्नमेघांनी मन उदास भरून येतं
अवघ्या असलेपणानं मी तुला धरून ठेवत्येय
बुडणाऱ्यानं वाचवणाऱ्यालाच घालावी मरणमिठी जशी...

मोगरकळ्या पिळवटून सांडलेलं उत्कट चांदणं...

## पाऊस येतोय हळुवार

पाऊस येतोय हळुवार
कळ्या टपोर होतायत
उमलून येण्याची असह्य लाज
अन् ओला परिमळ असह्य

उमलताहेत आत्ताच, उमलताहेतच शेवटी,
लाख लाख चांदण्या
लवचिक पोपटी कमानींवर
देवाघरचा पाऊस लेवून अंगांगावर

डोंगरगीत

गढुळलेल्या आभाळाखाली
डोंगराआड – पलिकडे दूर
वणव्यात काळंजून गेलेल्या वृक्षशाखांवर
बहरलेली पोपटपानं बहरताना गात असतात,
. . . रिमझिम. . . पावसात.

एकाकी उतारावर खबदाडीतून
खळाळून फेसाळून येतो बाळझरा
वेडगाणं गुणगुणणारा
त्याचा स्वच्छ स्वच्छसा गारवा
रोमांचात फुलून येतो–या रिमझिम. . . पावसात

सीमातीत हिरवळीवर
असंख्यातली गोडगोडुली रानफुलं
माना वेळावेळावून झुलत जातात

आभाळात
ओथंबून येतात खूप काळेसावळे ढग डवरलेले
प्रलयाकडे संथ सरकणाऱ्या कालप्रवाहाला
बांध घालीत बरसत रहातात
नजरानजरांच्या घनगर्द जंगलात
डोंगरच्या डोंगर नाचत जातात
रिमझिम पाऊस. . . रिमझिम पाऊस. . . रिमझिम पाऊस. . .

## नसेलच जर बोलायचं तर

नसेलच जर बोलायचं तर
इथं कुणाचं अडेल !
अधीरलेली कळी फक्त
दवामध्ये भिजेल

यायचं नसेल तर मुळीच नको
मनात दाटीवाटी
खोल खड्डा रुतवून घेत
डोह नुसता हसेल

नाही यायचं, संध्याकाळी
पापण्यांमागे भरून
ओठावरले एक गाणे
अंधारावर पुसेन...

## घनव्याकुळ रे प्रणयाची

घनव्याकुळ रे प्रणयाची
घेरून भीति मज येते
हिर्व्यात गर्दले रान
पान-पान दचकुन उठते

दचकून चंद्र डोकावे
हलते न अता मुळी रान
सावल्यात सरसर भीती
आत आत ओढुन घेते

निसटते हातुनी वेळा
बेबंद ध्वनी झणझणती
मनभरति, शिळा कोसळते
मन...चंद्र चंद्र चुरगळती

## बाकी

वाटलं असेल तुला मी उधळून टाकलं मला
सारं तुझ्यापायी, सारं तुझ्यापायी
समजू नकोस उगाच, पक्की हिशोबी मी
राखून ठेवलीय् थोडी बाकी काही

थोडी बाकी काही, ठेविली माहेरा
थोडीवर हक्क माझ्या मैत्रिणींचा
आता थोडी काही, खर्चायची कशी ती
याचा देखील हिशोब झालेलाहे पक्का

थोडी तुझ्या बापा, थोडी आईलागी,
भावंडांसाठीही, आहे थोडी माया
घराच्याही भिंती रंग थोडा खाती
दारांना वसूली हवी थोडी द्याया

अकस्मात काही येती म्हणे खर्च,
त्यासाठी थोडीशी, ठेविते बाजूला
तरी खूप काही, ठेवीनही बाकी
येणाऱ्या उद्याच्या मुठीत सानुल्या

## क्षितिजापलिकडेपर्यंत

क्षितिजापलिकडेपर्यंत
उलगडत गेलेल्या त्या हिरव्यागार गालिचावर
मी होते तुझ्याबरोबर
होते,
कितीदा नव्हतेच
नव्हतेच मी माझीदेखील
पवनचक्क्यांच्या त्या अद्भूत प्रदेशात
फूलपाकळ्यांच्या ऐन कल्लोळात
पंखच पंख
एकाच जिवाला
इथे, तिथे, कुठे, कुठे
भ्रमविणारे

असंख्य पंखांतून
क्षणाक्षणांतून
विहरत असणारी
हिरवी लय
व्यापून मला
बुडवून मला
विरवून मला
हिरवाईतून

## गाणे

तजेल अंधारात पाऊसधारा गाणं गुंफीत येतात
चमकून जाणाऱ्या वीजप्रकाशात
झाडंदेखील थक्क होऊन पहात रहातात
थेंबोथेंबी हजार डोळे फुटलेले असतात त्यांना...

मातीचा मस्तबाल उत्कटउत्कटसा वास
नीरफणसांवर ताल घेऊन झिंगून येणारं पाऊसगाणं
भिजून भिजून येतं मनात
ते न ऐकायला माझा तू, असतोस मैलोमैल दूर हरवलेला आणि
ढगांमधून कोसळणारं हे गाणं, जबरदस्तपणे
अंधारात एकटंच गात रहातं स्वतःसाठी
खरं नाही ते... ते माझ्यासाठी...

## मनामनांची जुळणी

मनामनांची जुळणी
काही क्षणांपुरती का होईना
अगदी खरी होती ?
की एका मनात, तिसरंच मन सलत खुपत नांदत राहिलं ?

कण्हेरीच्या झाडोऱ्यातली
घट्ट घट्ट मिठी
मिठीतल्यापुरती तरी, होती न खरी ?
की तीव्रही
कुठली.. कुठली... स्वप्नफुल ढळत राहिली ?

आवेगानं चुंबलेल्या ओठात
कुठल्या गुलाबाच्या
पाकळ्या चुरमडल्या ?

## तुझ्या माझ्या डोळ्यांच्या भेटींच्या वाटा

तुझ्या माझ्या डोळ्यांच्या भेटींच्या वाटा
इमानदार चिऱ्यांनी पुरत्या बुजवून टाकायूच्यात मला
कशाला भेटायचं ?
उपचाराचं हसूं देखील असं अडतं–की...
खेचीत आणावं लागतं ओठांवर–

अंनर्यामातला असह्य ठणका भिनत जातो अवघ्या देहात
पावलं जडशील होतात, जिवंत असल्याबद्दलचं भय
नसानसातून जमत जातं मूठभर हृदयात नि
तड–तड लागते अगदी–

माझेच डोळे चुकवित राहातात मला
असहकार पुकारतात माझ्याशीच
प्रतिबिंबित केलेलं एवढंदेखील बोलत नाहीत

भुरु भुरु माझी माती
उडून जाते
तुझ्या डोळ्यातल्या उजाड माळावरती

## तहान

सांजवेळी
सळसळून पिंपळपानातून
हुरहूर घरात शिरते

हुरहूर शिरते घरात
पडदे भ्यालेभ्यालेसे होतात
किणकिणणाऱ्या घंटा त्यांना चक्क हसत असतात

इकडेतिकडे भलतीकडे बराचवेळ भिरभिर
शिणलेल्या पापण्यातून थकत रेंगाळत,
कोवळे केस फिसकारत
खोल खोल ओणवते–लांब क्षितिजापलिकडे दृष्टी
अंधारभरल्या डोहात
ठेचकाळते कुठल्याशा चाहुलीला जेव्हा नि दचकते–
तुझी तहान...तहान रे लागते अगदी

केविलवाणे

साशंकतेत तर्र भिजून येताहेत हे क्षण
भिजून जड होताहेत– तरीही लांबटणारे हे क्षण
मुसक्या बांधून घातलाय् कैदी
मस्तकावर टपटपताहेत अखंड उकळणारे क्षण
असहाय्य सोशीत रहाणे
सारे सारे केविलवाणे...

# दूरची पडशाळा

पुन्हा मावळतीकडे निघून जायला
हवंय का मला ?
कुणाला माझ्यापासून लपायचं असेल
तर जाईन मी निघून—वाऱ्यावर तरंगत
पावसात भिजून—विरघळून जाईन
मग विश्वास डळमळायचं कारण तरी काय ?
इथं माझ्याही भोवती. समुद्रढगांच्या भिंती
कोसळत नाहीत काय ?
तासन् तास सरकत जातात
कुंड्यांमधली सगळी पानं, निस्तब्ध
टवकारून पहात रहातात
आणि कुठल्या दुरून येणाऱ्या अक्षरवेलीत
मी गुरफटून गेले की मोकळेपणी हसू लागतात.
मग... पुन्हा मावळतीकडे निघून जायला
हवंय का मला ?
कुणाला लपायचंच असेल जर
जाईन मी निघून
वाऱ्यावर तरंगत
पावसात भिजून
विरघळून जाईन

## ओहोट

ओहोट लागलीय दर्याला
दंगा करणाऱ्या लाटा परतून गेल्यात,
उरल्यात ओल्या सुरकुत्या, फिका संधीप्रकाश
क्षीणपणे साठवित...
कोरड्या रेतीत, मी सुनसान, मुठीतून रेती गळणारी
माझं एकटेपण हरवायला,
फसलेले क्षण उधळायला,
धावत सुटले क्षितिजाकडे थेट
क्षितिजाशी... भेटेल... ते सारे ?
की शिडात शिरतील भलतेच वारे,
दाखवीत दुसरेच किनारे...

## चांदण्यात वीज चमकावी

चांदण्यात वीज चमकावी नि
चांदण्यालाच चूड लागावी
अशी किमया
तुझ्या थंडगार नजरेची...

## अस्पर्श

वाऱ्यानं पानांना हलवायचं
पानांनी सावल्यांना झुलवायचं
अस्पर्श विकल सावल्या
अज्ञात पावलांनी तुडवायच्या...

## ताण

जसे पानांमधून हलणारे हजार कवडसे
तसेच काहीसे तुझ्या बाबतीत
वाऱ्यावर सहजी बदलणारे
सगळे समजून काहीही न उमजणारे
आणि समजून उमजूनही सतत सलत रहाणारे
तीव्र, ताणलेल्या, तंतूंवर तोलून रहातं मन
तंतूंच्याच तुटण्याची भीती घेऊन हरक्षण

## वाघ

वाघ पट्टयापट्टयांचा...
सर्कशीत मी वाघ पाहिला, जंगलात नव्हे.
तरीपण वाघच
शेर, शेर ए दिल !
वाघोबा, चपळ, भीतिदायक, मिशा फेंदारलेला, पट्टयापट्टयांमधून
भेदक,.....सावध डोळ्यांचा
प्रेयसीच्या नजरेत याची नजर कशी वितळत असेल ?

तर वाघ, हंटरच्या फटकाऱ्यांनी चवताळलेला
माना वेळावीत गुरगुरणारा, डरकाळणारा
तरीही असाहय्य, आज्ञाधारक
आणि त्याचवेळी डौलदार, रुबाबदार, पाठमोरा वळूनही
जाडजूड शेपटीत सारी आढ्यता एकवटून–

उंच स्टुलवर चढला वाघ चपळाइनं
सर्कस सुन्दरीनं लीलया मान जबड्यात दिली वाघाच्या
सरसरून काटा आला अंगावर...
वाटलं...वाटलं की तूच वाघ अन् मी अर्थातच
सर्कस सुन्दरी
हंटरवाला नाहीच कुणी आसपास
आता तू काय करशील ?

# मन

पुन्हा पुन्हा तुडवल्यावरही
पुन्हा पुन्हा फुटणाऱ्या गवतपात्यासारखं
मन भारी लोचट
मुर्दाड मेलं– !
जरा कुठं तुकडा पडताच
तरारून उठतं
गवतफुलासारखं

घाबरट असलं
स्वरूपालाच भीत असतं–
कुणी काय म्हणेल–कोण कसं हसेल... सारखा संशय
जरा कुणी 'ब्रेव्हो' म्हणताच,
आत्मविश्वास वापस !

कधी कधी वेडं - हरवून येतं स्वतःला
नि शोधत बसतं काहीबाही
कधी भोळंखुळं माझं
सांजवेळी पाणी गाळी

हट्टी हट्टी मन अगदी
चिव्वटपणे जगत रहातं–रिकेटलेल्या पोरासारखं
कधी मेलं पुरतं मरेल ?
आणि जरा सुख लागेल...

## इंटरप्रीटर

चांदण्यात दरवळत रहाणारा निशिगंधी दरवळ
नाहीतर पुस्तकातलं सुकून उरलेलं बकुळीचं फूल
कुणीही हलकेच समजावणी करेल या चिमुरडीची
सहज हसू फुलून येईल पाकळी पाकळीमधून...
पण तो ढापणं लावलेला
अनेक पात्रसाळ्यात भिजून कच्च झालेला
तोच तो प्रौढ, शिष्ठ अलिप्त
कायम टक्क उघड्या डोळ्यांचा
पेंग आल्यासारखं दाखवून
पुन्हा सारखं टोचत राहणारा तो
इंटरप्रीटर
सतत क्षणातून अर्थ धारण करीत रहातो तो ससंदर्भ
त्याला कोण कसं समजावणार ?

## वसंत

जख्ख सुकल्या खोडाला
अवचित बोचे सुई
अशी पोपटी कवळी
आणि होत खोड जागे
देत हिरव्या जांभया
'आता पुन्हा उठायाचे
आता नवे जगायचे...'

भिंत

कितीदा धुकं विरतच नाही
पक्क्या विटा बनत जातात आणि लगोलग
दुराव्याची भिंत...
भिंतीआड स्वयंपाक
गळलेल्या, नाजुक, सुकोमल पाकळ्यांची भाजी
स्नेहहीन पोळ्या
लसणीच्या फोडणीचा खमंगोग्र शिळा संसार
दुद्दू, शीशी, सूसू, औछदानी सुफल संपूर्ण झालेला

## मन वैरी

मन वैरी
तुज फसवी
मज फसवी
विषबाधा
तप्त सुधा
घन पिंजण
लोळ विजा
रात द्विधा
फटकारत
विद्ध मना
मन वैरी
फसत राही
जगण्याचे
सोस फुका

# अंधार

कधीही खरा अंधार नसावा का शय्याघरात ?
अनुभविक कुंजामधल्या शाखासावल्या भिंतीभिंतीवर हलत रहाव्यात ?
आदिम अनावर इच्छेने पेटून लसलसत्या ज्वाळांनी
एकमेकींना उजळत जळत जाळत
अंधार न व्हावे का ?
शतकानुशतकांच्या भूतकालीन पेशी नसानसातून प्राणवायू
शोषून नवे जन्म लाभूनही तशाच समर्पणाच्या इच्छेने
वाहून जाव्यात ?
घेणे-देणे संपून मिटून देणे-घेणे होत जाऊन एकमेक होत रहाणे
की रक्ताच्या एकेका उसळीनुसार पहारे बसवावेत तीवर
प्राचीन रतीशास्त्राचे गणिकांसाठी निर्मिलेल्या ?
अंधारांचे, पेशींचे, रक्तप्रवाहांचे, आसक्तींचे, मनोधर्मांचे
असले कसले हिशेब मांडणे
सर्वथैव चूकच
अंधार असेलच तर देत घेत कवेत घ्यावा
नसेलच तो तर भिंतींवरचे शाखापल्लव सुचवतील
तसेच सारे सारे देत जावे—
कोरडे होत रहावे.

## परतीची वाट

परतीची वाट
मागे वळू नकोस
गायी लागल्यात धारेला–
नको ... व्याकूळ होऊस
ती उदास फुलं
अंधुकली आता
अंधारात विरून जा
देहमनानं पुरती
तुझ्या अशब्द दुःखालाही
उधळून जा जाताना

## किती किती

किती किती सांगायचं राहून जातं रे
जे नुसतं वाचण्याच्या नि जाणण्याच्या पलिकडे . . .
तसं साधंसुधंच
पण नाही येत असं गडबडीत सांगता काही
सांगावं सांगावं नादत रहातं अन्
तशाच दूर पळून जातात घटका
परतत नाहीत पुन्हा कधी
हे असं किती साठत जाईल सांगायचं ते
हा जीव कसा जड होत राहील जगता जगता
शेवटी मग
मातीतूनच सांगून जाईन सांगायचं ते . . .

## माझ्या मना

बेहोष क्षितिज झापणाऱ्या माझ्या मना
जळत्या पंखांनी उडत रहाण्याचा हा चिरंतन शाप तुला
कुणी दिला ?
कशासाठी ?
काय केलास असा अपराध ?
यावर उःशाप नाहीच ?
हिमनगांवरून दूरच्या अनोळ्या देशात उंच
उडतानाही
कशी बांधतोस अशी निखाऱ्यांची धगधगणारी
माला कंठाशी ?
जादूभारल्या या खाऱ्या पाण्यानं
शमव आर्त तृषा क्षणभर
हो शांत जरासा,
ये परतुन माझ्या मना

वेगळीच

टिकटिकणाऱ्या या घड्याळकाट्यात
भोवळून जातो जीव
दिशा गडद होऊन येतात डोळ्यात
तेव्हाही अधुऱ्या भासावर
विणीत जातो नवे नवे आभास

खरं तर ...
अफाट माळावर
खुणेचा एकदेखील दगड नसतो
एकदेखील नसते नवे, हिरवे पाते
सोनेरी झळा लेवून एकाकीपण सजून असते
गिळू येते विश्वात्मकता
असहाय्य तेजःकणाला
सामावून घेते स्वतःत
आणि दिशा, दिशाच उरत नाहीत

तरीही
पृथ्वी,
आप,
तेज,
वायू,
आकाश
आणि मी, ... याहून वेगळीच

## दिल्या घेतल्याशिवाय

एरवी वाऱ्याशिवाय या झाडाचं भान नसतंच कुणाला
नसतंच ऋण मनात त्यानं अंथरलेल्या सावलीचंही
झरणाऱ्या पानांतून, एकाकी फांद्यांमधून, ते सुनंसुनं होत जातं
वाऱ्याशिवाय उमटणारे त्याचे निश्वास
संवादी होऊन जातात माझ्याशी

डोळेभेट. . .साधा शब्दही नाही वाऱ्यावरला कानावर
फक्त दरवळणारे श्वास, इथे. . .तिथे. . .क्षणोक्षणी
एकातून एक धुंदावणारे रंग हिरवेगार
भिरभिरून येतं हे पान मधेच खांद्यावर
सतेज, पिवळं
बळेनी दुरावलेलं झाडापासून की सहज अल्लद उतरलेलं ?
झाडांनाही पिवळेपणाचं ओझं होतच असेल

इतकं जर सारं मनापासून आणि उत्कटही असेल
इतकं जर सारं शांत समजुतदारपणानं सोसायचं असेल
दुराव्यातही तर मग तुटण्यासारखं काय असेल !
पण रसरसून येणाऱ्या या रक्तवादळांसारखेच
हृदयस्थ आवेगही शरत्कालीन मेघांमधून आणि पावसाळी नद्यांतून
ओसरत जातील
तर. . . हिरवाई हरवलेल्या या नक्षीदार जाळीतून काहीच शोधूया नको

झाडापानांना मधे घेतल्याशिवाय काहीच का सांगता येऊ नये ?
तुकडे पडलेत पायाचे हा कालातीत अटळ रस्ता एकटेपणानं तुडवताना
रोज रोज होणारे सूर्योदय अन् सूर्यास्त सतत सताड डोळ्यात
दिवस दिल्याघेतल्याशिवाय तसेच सरकून जाणारे
अखेर या मातीत गाडून घेणे आहे.
कोसळलीच जर पर्जन्यधार इमानानं
यायचं आहे पालवून पुन्हा, नव्यानं, नव्या हिरवाईतून

## अंतिम सत्य

मृत्यूच्या काठावर ओठंगून असणारा तो बेभान क्षण
मला मिठीत घ्यायचा आहे–
केसांमधून हळुवार बोटं फिरवीत
चुंबायचीय ती लालस कानपाकळी
मानेवरचा उष्ण श्वासोच्छ्‌वास अनुभवीत
चाहूल हवीय त्या रक्तप्रवाहांची, त्याच्या हृदयातल्या
धडधडीची
शोषून घ्यायचेत मादक हालचालींचे उष्ण ओठ
कुस्करून घेणे गात्रन् गात्र
अधीन अधीन होऊन जायचेय त्याच्या

होऊदेत कितीही मग बदफैलीपणाची खमंग चर्चा
सवंग अनुमाने
पण कधीतरी . . . लवकर–
कवेत घ्यायला हवाय तो क्षण
हीच उर्मी माझी, हा
एवढाच जिवंतपणा
आता धीर नाही जराही
माझे मलाच स्पष्ट बजावायचे आहे–
की मरून जायचे आहे
तो बेभान क्षण मिठीत घेऊन
मिटून जायचे आहे . . .

## तिनं एका बाळाला जन्माला घातलं तेव्हा

तिनं एका बाळाला जन्माला घातलं तेव्हांच
त्याला आणि जगालाही
लाख लाख माफ केलं
टराटर वाकडंतिकडं फाटत गेलेलं मन
आईपणानं शिवून घेतलं
तेव्हापासून
सारं जगच फाटत राहिलं
पुन्हा पुन्हा आईपणानं शिवण्यासाठी

## त्रिकालाबाधित

आभाळाचं रडणं कदाचित खोटं असेलही
पण वाराच धाडून देत असतो ना ढगांना ?
आभाळ असेल दूर
नितळ, निळं, सीमाहीन
कधी झाकळलेलं, वीजफुलांनी लखाखलेलं
हळवंही असेल–व्याकुळवाणं रडत असेल साकळलेलं
कधी मदोन्मत्त होऊन
वीजफुलांच्याच सपकाऱ्यांनी
भस्मसात करील ही टिचभराची दुनिया
तरीही
ते आभाळ
आभाळ म्हणून खरंच असेल–
खरंखुरं, त्रिकालाबाधित

## माझ्या चिमण्या

अवचित पाऊस आला आणि
गरागर उडणाऱ्या पाचोळ्यासारख्या, माझ्या चिमण्या
धावतच सुटल्या नुसत्या, गोल गोल धावत
गाऱ्या गाऱ्या भिंगोऱ्या घालीत चिंब भिजून गेल्या
अवचित झालेल्या पाऊसभेटीनं हृदये फुलून आली त्यांची
डोळ्यात चमकदार आश्चर्य ओतप्रोत आणि गाल गुलाबी तकतकीत
केस मात्र चिडीचिप्प शहाण्यासारखे आणि फूलदार फ्रॉक्स रुसून बसलेले

पायाखालून केवढे पाणी गढूळ गढूळ खळाळत जाणारे
मला चिकटलेल्या चिमण्या माझ्या, ओल्याचिंब... गप्पगप्प...

वादळ

उगाच आसवं न सांडणाऱ्या आज्ञाधारक पापण्या
चाकोरीतून चालत रहाणारी गुमान पावलं न चरफडणारी
यावर ओरखडे ओढायला चरचरीत
एक व्याकुळ वादळ बेगुमान घोंघावत येत आहे
निर्ढावलेलं मन
त्याला हळुवार पीत आहे--

## लाटांवर हेलावून येतात

लाटांवर हेलावून येतात निर्माल्यामधली फुलं
या उदास ओळींमधून संवेदना तुझ्या...
क्षितिजापाशी परतून का न जावे त्यांनी
उदासवाण्या घुटमळतात--माझ्याच असण्याभोवती
घुमवतात सजल सूर
' सखे तुझ्या अंधारघनावर चांदणवेल नसे चढणारी '

स्वप्नात शिरलास
त्याहून एवढा अधिक का उरलास ?

## सुकत आलेल्या तळ्यात

सुकत आलेल्या तळ्यात
अल्पवयीन पिकुटलेली कमळपानं
घायल् हरिणीच्या डोळ्यांनी
जागच्या जागी तडफडणारी, मी पाहिली--
वारा एकसारखा ढोसत राहिला त्यांना तेव्हा
बिचाऱ्यांना तुझ्या सावलीत लपवून मी घरी आलो, तर
फडफडणारी कमळपानं नेसून,
कळ्यांना जपत,
तूच उभी दारात,
निरंतर तिष्ठत
सुकत आलेल्या तळ्यात
जागच्या जागी खिळून.

## शहारा

आत्ताच न पाहिलं ?
ओळखलं
नि हातात हात घेतले

सांगायचं आहे ते ओसरतच नाहीये अजून
तरीही का हा सर्रकन शहारा... ?
हातातून हात गळून जाण्याचं हे भय...
या साऱ्या वाटा किती दूर भेटणाऱ्या आणि
जोडीनं जाणाऱ्या पाखरांवरची ही घायाळ नजर

किती छान सावरतोस क्षणार्धात...
किती छान हसतोस डोळ्यातून
केवढा उत्कट होत जातोस–
खराखुरा

## सुकत आलेल्या तळ्यात

सुकत आलेल्या तळ्यात
अल्पवयीन पिकुटलेली कमळपानं
घायळ् हरिणीच्या डोळ्यांनी
जागच्या जागी तडफडणारी, मी पाहिली--
वारा एकसारखा ढोसत राहिला त्यांना तेव्हा
बिचाऱ्यांना तुझ्या सावलीत लपवून मी घरी आलो, तर
फडफडणारी कमळपानं नेसून,
कळ्यांना जपत,
तूच उभी दारात,
निरंतर तिष्ठत
सुकत आलेल्या तळ्यात
जागच्या जागी खिळून.

## शहारा

आत्ताच न पाहिलं ?
ओळखलं
नि हातात हात घेतले

सांगायचं आहे ते ओसरतच नाहीये अजून
तरीही का हा सर्रकन शहारा... ?
हातातून हात गळून जाण्याचं हे भय...
या साऱ्या वाटा किती दूर भेटणाऱ्या आणि
जोडीनं जाणाऱ्या पाखरांवरची ही घायाळ नजर

किती छान सावरतोस क्षणार्धात...
किती छान हसतोस डोळ्यातून
केवढा उत्कट होत जातोस–
खराखुरा

## ते त्यावेळचं सोळाव्यातलं

ते त्यावेळचं सोळाव्यातलं काही मानू नकोस
नव्हतेच कसले पहारे
केवळ गूढ अनोळखी संवेदनांमधून
फुलत गेलेले शहारे
कशाचीशी अस्फुट चाहुल घेणारे
स्पंदनांचा वेग वाढवणारे ते क्षण

पण आता—
सातासमुद्रापलिकडच्या निळ्या सरोवरातल्या
सातमजली मिनारावरल्या नागराजाच्या
विषारी विळख्यातल्या
घट्टमिट्ट मखमली पेटीत
दूरस्थ चांदणीने डोकवायचं म्हणजे
नको रे
मिनारच कोसळणार नाहीत फक्त
सरोवरातही विष पाझरेल
आणि पृथ्वीला वेढून राहिलेले साती समुद्रदेखील
पेटून उठतील पुन्हा

२४९२
२००७०
काव्य ३।११।८३

## वाऱ्यानं त्रिणलेल्या संध्याकाळी

वाऱ्यानं विणलेल्या संध्याकाळी
तू - मी बांधून पैंजण पायी
चालत होतो चंदेरी लाटांवरून
क्षितिजावरल्या सोनेरी राजवाड्याकडे

काय झाले नकळे
पैंजण पायीचे गळाले
पुन्हा बांधाया मी वाकले
डोळे अंधारानं झाकले

कुठे मी काहीच कळेना
एकही पैंजण मला गवसेना
लाटांमध्ये बुडताना
माझ्या शिरावर -तुझीच पावले

## प्राक्तन

या क्षणी पूर्वेलाच असते तर
माथ्यावरून सूर्य सरकून गेला असता केव्हाच
पश्चिमा वाट पहात रहाती याच सूर्याची
याच क्षणी

पण मी इथे उभी मध्यावर, सूर्ययात्रेच्या मार्गावर
जन्म, मृत्यू, घात, अपघात
साऱ्यांचेच रंग दिपवून टाकतात इथे
चकाकत्या उन्हात

सूर्य नुकताच कुठे आलाय् माथ्यावर
कुणाकुणाला तुडवून, भाजून, जाळून जाण्यासाठी
पश्चिमेला सोनेरी उन्हात सजवून ठेवण्याची त्याची घाई

## प्रवास

. . . कुठे ? . . . कसे ? न कळताच प्रवास सुरू झाला
सांजावलं होतं त्यावेळी
चांदणंही ढगाळलेलं
रेंगाळलेल्या होत्या थोड्या सावल्या
त्याही भराभरा अंधारात चालत्या झाल्या
उरलो आम्ही ... आणि आमचा अंधारातला अटळ प्रवास

## फुलत्या निखाऱ्यासारखे

फुलत्या निखाऱ्यासारखे तुझे बोलणे
वाटले . . . कधी विझायचेच नाही
ठेचाळलास, थकलास आणि विझत्या डोळ्यांनी शोधू लागलास
तेव्हा मऊ परांचा बिछाना अंथरला काळजात
आणि उत्कटतेचाच कळस होऊन गेला

आता संध्याकाळ
ही आजची ओहोटीची वेळ
सुवर्णभासात ही वाळू चमचमत असतानाच
कणकण शोधून तुला वेगळे करते आहे
काळीज सोलून तुला गोळा करते आहे
पंखात पुन्हा भरारीचे बळ येऊ दे
तुझ्यापुरते मला संपून जाऊ दे

दया कर
निघून जा मागे न पहाता
पुन्हा व्याकूळ फासे टाकून
काय साधशील ?

## वाहत्या पाण्यावर

वहात्या पाण्यावर का डोळे जडले होते ?
पाणी सगळेच वाहून गेले का ?
वाहून गेली ? पाण्यावर थरथरणारी शुभ्र प्रतिबिंबे
कुठेत् ? पाण्याला स्पर्शून जाणारे पारदर्शी पंखांचे चतूर
ओळखायला हवेतच, हवेतून येणारे सूक्ष्म बदलते इशारे ?
शोधायलाच हवी  परतणाऱ्या पक्षांची हरवलेली वाट ?
कशा थांबवायच्या जीव भिजवून जाणाऱ्या ओसरत्या लाटा ?
कसे घेऊ गुंफून ? विरत जाणारे सांध्यरंग
तटातट तुटतात रेशीमधागे ...कसे ... कसे ... सोसायचे हे सारे ?

## कातरवेळी

फुलत्या कमळाची पुन्हा कोमेजली कळी होताना
वाऱ्याला दुखवीत अधीर सूर अंधारे होऊन येतात
सरता सुगंधतोही कमळमिठीत कोंडलेला
दुःखानंदाचे मंद तरंग एकातून एक पसरत जातात
पापपुण्याचे हिशेब विरत जातात
भिरभिरत रहातात पिकली पानं भयाण काळोखात
रुतून राहिलेले शर लपवीत
दुःखाचे जहर गोठवीत–
डोह अधिकच काळा काळा हसत रहातो

मानसचित्रे

पानांमधुनी घुमतो वारा
पाना हलवुन जातो
सावल्यांवरी उतरे वेडा
वारा विरून जातो...

...

कोमल झाले, ऊन गळाले
सोनमुलायम पाने
पानगळींच्या आठवणींनी
शहारणारी राने...

...

नभ पाण्यावर झुकले
नभ पाण्याचे झाले
सागरपक्षी पाणी सोडुनी
दूरच दूर निघाले...

...

आकाशाच्या फांदीवरती
नक्षत्रांची दाटी
पाणी हेलावते जरासे
खिन्नपणे एकाकी...

## शत्रुत्व

शब्दांचं शत्रुत्व एवढं संभवातीत होतं की
कोणतीही बेसावध वेळ साधून ते स्वप्नातही घुसलं नव्हतं

साधेभोळेसे हसायचे शब्द रानफुलांसारखे
गुणगुणायचे गुपितं, मनामनांची, हसूंची, आसूंची
सतत ओघळून न संपणाऱ्या
व्यथावेदनांचाही सूर धरायचे–कधी कधी

पण हे असे...आईच्या दुधातूनच विषबाधा झाल्यासारखे काही
काहीतरी गळा रोधणारे
हे, हे या शब्दांमुळे
यांच्या बदललेल्या पवित्र्यांमुळे

कसे येतात हे शब्द अलिकडे चाल करून येणाच्या आवेशात
जवळ माहीत न माहित संदर्भाचे अर्थ-अनर्थ
दारूगोळ्यासारखे ठासून भरलेले
थेट आतवरच चालून येतात शब्द
मग आत, थांबून थांबून, स्फोटांवर स्फोट

वेचिराख हृदयभूमीवर
उगवून येतातच
मैलोमैल शब्दभोर राने

## मंत्रबद्ध शब्द

मंत्रबद्ध शब्द आणि काळेशार पाणी
बहारून येणारा फलोरा... साक्षात रोधून धरतात
अशा कुवेळीचा मुहूर्त शोधून
रक्ताचे रंग पालटून
मी प्रवाहात पाय बुडवून घेते
नि दूर चालत जाते

कोसळून येते वाटेत ही
जुनाट चौकट, खिळखिळी होऊन धडाडत
शान्त सहजपणे तिची समजावणी करणं
कसं अवघड होऊन जातं
मग लीलया देते भिरकावून
तिच्या नेहमीच्या आज्ञाधारक जगात
आणि नुसती चालत रहाते मी

क्षितिजरेखेची सनातन फसवणूक
प्राणांवर पक्की नोंदवून घेऊनदेखील
ही पावलं अशी का फरपटत जातात
त्या अज्ञात वाटेवरती

बळेनी लोटाव्यात पापण्या डोळ्यांवर
तरीही पहात रहातात
कानात खुपसावीत बोटं जहरीली
तरीही कानात घुसतेच,
मनावर कोरलेल्या रेषा रक्ताळलेल्या
सचेतन नाचत रहातात,
उजाडता उजाडता बळेनी उठावे तो
डोळे मिटलेले, कान विटलेले, हात तुटलेले
मन पाषाणात कोरलेले

...

शरण, मनाला मारणाऱ्या या देहाला
शरण, त्याच्या भुकेला, वासनेला, कोडगेपणाला
म्हणून, शरण त्या अन्नाला, त्या पाण्यालाही हवेसह,
शरण या देहात वस्तीला येऊ शकणाऱ्या तमाम रोगजंतूना
या देहानं मोजून काढलेले उन्हाळे पावसाळे
या देहात वहाणाऱ्या रक्ताचे लागेबांधे
देहात वाढणाऱ्या अस्थिमांसचर्मसमवेत
शरण जायलाच हवे या सर्व अजगरविळख्याला
या देहाच्या सर्वव्यापी सत्तास्थानांवर
द्यायला हवे बळी सर्व सहज इच्छांना
ध्येय, स्वाभिमान, आदर्श या सर्व फुसक्या फुग्यांमधून
द्यावी हवा सोडून भरावी खळगी, जमल्यास खिसेही
इमाने इतबारे.

...

या अथांग डोहात मला माझी सावली देखील पहायला नकोय
जाग आल्यापासून धावते आहे जिवाच्या आकांतानं
कासवाच्या गतीनं शर्यत जिंकून
डोह पुन्हा येतो सामोरा
पुन्हा, पुन्हा, पुन्हा ...
डोहात हलत असतात वडिलधाऱ्यांच्या जरजार्जर, सावल्या
लुळ्या मोडक्यांचे तुटके अवयव भीषण गरगरत रहातात
असहाय्य लहानग्यांची क्रंदने,
कराकरा कापून काढलेल्या ताटातुटी
लाटांतून कल्लोळत येतात.
येते भुकेचे थैमान, लक्तरांमधले भेसूर देह
चिंध्यांतून चरत जाणाऱ्या महारोगी जखमा
डोहामधली असंख्य प्रतिबिम्बं मस्तक ठेचू पहातात माझं

हा निरंतर पाठलाग
गत्यंतर नाही, डोहात सांडल्याविना
दूर पळणाऱ्या नव्या वाटा, तळाशीच शोधायला हव्या

## स्वप्न

पापण्यात मी संभाळून ठेवलेली रंगीन स्वप्न
पारदर्शकपणानं खुपत असतात डोळ्यात तुमच्याच
तुमच्या डोळ्यात फुलतात विखार
राख करतात या पापण्यांची

पण माझी स्वप्ने शाबूत
बिलंदर केव्हाच दडलेली असतात
भिरभिरणाऱ्या चिमण्या काजळी डोळ्यात !

काटे

एका हळव्या फुलाच्या
दुमडलेल्या पाकळ्या हळुवार उलगडून मी
पाहू गेले आत लपलेले तेजस रंग
तर झाकले त्याने अधिकच आपले अंतरंग

मी नाही हट्ट धरला मग
उगाच या बोटांनी फूलच फाडायचे
मोडलेच जर काटे माझे
तर त्याचे काय एवढेसे मोठे

## डोळे

आंधळे डोळे देखील... केवढे बोलके असतात
आंधळे डोळे देखील... केवढा आनंद मिचकावीत असतात
मिचमिच मिचमिच पापण्या... पापण्यांवरचा केसन् केस
डोळ्याखाली सुरकुतलेली वर्तुळ
नाकाच्या विस्तारलेल्या पाकळ्या
सगळी सगळी एकदम बोलत रहातात
" वहिनी तुम्ही आलात ?
संतोषसर बरे आहेत ?
आणि वहिनी... छकुलीला आणलीत नं ?"
छोट्या बाळासाठी
डोळे हात पुढे पसरतात
" वहिनी, द्यानं छकुलीला "
डोळे आर्जवानं बोलतात
डोळे व्याकूळ, विनवतात
डोळे लाचार लाचार होतात
" वहिनी अगदि पाचच मिनिटं "...

वहिनी विरघळतात
जणू चोरलेला माल, मुकाट्यानं मालकिणीच्या ताब्यात देतात
छकुलीला . . .
डोळ्यांची भाषा समजत नाही
अधीर स्पर्श सोसवत नाही
अनोळखी हात मानवत नाही
छकुलीच्या किंचाळ्या . . .
डोळे फोडत रहातात
डोळे शरमेमधे फाटत रहातात
आंधळे डोळे ओघळत रहातात

## काले बादल

काले बादल!
मूर्ख दैत्यांसारखे खडे झालेत लढायला,
प्रतिस्पर्ध्यांचं अबलत्व न अजमावताच
मध्येच थयथयाट करीत पाजळताहेत कडाडणाऱ्या बिजल्यांची पाती
इशारा होताच मूर्खांसारखे एकतर्फीच लढत रहातील
पुन्हा एकदा इंडियन न्यूजच्या तेजपिसाऱ्यात
पराजयाची चित्रं सरकत जातील
माजलेल्या नद्या, जळजळीत जिव्हांनी गिळत जातील
अफाट पसरलेली शेतंभातं–आणि खोपटं!– बिचारी खेडुतं
भेदरलेल्या कच्च्याबच्च्यांना खांद्यावर घेऊन नीराश्रित निघतील
वाकल्या देहांच्या मोळ्या सावरीत कुडकुडणाऱ्या कुठं जातील?

## तुटका पाऊस

हे तर केव्हाच समजून चुकलंय
आमचे टाचके पदर फाडून केलेल्या चिंध्या
तुमचं आगीत होरपळणारं दैन्य झाकणार नाहीत
पक्क जाणून आहोत आम्ही
तुमच्या जळत्या जखमांना शांत करतीलसे चंदनी लेप
आम्ही नाही लावू शकत
चंदन तोडून फोडून राखरांगोळी झाली केव्हांच
डोळ्यामधल्या पाण्याने फक्त खारवली आहेत
आमची इवलाली सुखं, आम्हाला जेमतेम जगवणारी

...तर या धूळपाटीवरली एकएक अक्षरं पुसत गेली
वेलांट्या मात्रा मुळाक्षरे काने उकार ऋकारही क्रमाक्रमानं
किंवा एकदम सर्वांत्र बोळा
एकदम विश्वासच तडकावा तसा

कशातूनच उगवत नाही पुरी वाढ घेणारं एखादं झाड
आभाळस्वप्न फुलवणारं
हेच बहुधा इथलं अंतिम सत्य असणार
तर कशाला हा तापल्या मातीवरचा तुटका पाऊस
शांत करत नाही
शांत राहात नाही
नुसताच आपला सुगंधी बभ्रा !

## झाडावरच टांगलेल्या काळजाचा घड

झाडावरच टांगलेल्या काळजाचा घड
अलगद एकदा ह्याती दिला कोणाच्या तरी
निर्बुद्धपणानं वा पक्क्या हिशोबानं
म्हणजे आपलं जगायला बरं
घड, घडानं, नव्या जुन्या घड्या उलगडीत
घडी घडीत सुख साठवीत ...

फुलांसाठी...

फुलांना
उडता येत नाही
खुडता येते
वाट्टेल तेथे
फेकता येते

फुलांना
कुठे येते हुंगायला ?
पण विणतात गंधजाल
... फसण्यासाठी

सुकोमल पाकळ्या फुलांच्या
शय्या इतरांची
सुरंगी सरण फुलांचे
ते फक्त स्वतःसाठी

न्याव

आयच्यान्- कायबी गुन्ना जाला न्हवता,
नाय, हिरीवर पानी न्हवतं भरलं कुनीबी
ठेसनाकल्डया पाटावर जातो न्हवं आमी ?
छ्याः, सावलीचाबी इट्टाळ न्हाई वो
म्हन्तील त्येवडी टमरेलं, हां हातभट्टीचीच, भरून दीत व्हतो पगा
फकस्त योक येडं–आयच्यान् खुळंच ते पयल्यापूंन
टेर पिऊनशान झेलपाडलं रस्त्यावर, सरपंचाच्या बाळासायबासम्मूर
बडबडलं काईबाई, आदीच खुळं पघा
आन् त्यात मंजी प्याललं इक्तं
तर येकल्याला धा जनांनी वो चेचलं...
बेसुद झाल्यावर मेल्या ढोरागत वढून गावाभायिर टाकलं पघा
तरीबी आमी शबुद नाय काहाडला...

आन् मध्यानूराच्च्याला
जित्या कोमडीची पिसं नि पख्खं उचकटावीत–
तशी पालं वो उसकाडली त्येंनी

ध्यासबत्त्या आनल्या व्हत्या,
मानूस मानूस वरबाडून काल्ढं भायिर
हामी यिनवून यिनवून मिंत्या केल्या,
पायावर डोचका ठिवला वो त्येंच्या,
पर गांडीवर लाता हानल्या, दांडक्यांनी बडवूनशान्
आमच्या बायामानसांची लुगडी वो फेल्डी
न्हाई न्हाई तित्तं चामडी सोलली, प्वाराबालांच्या दोल्यादिखूत
कोकरं भ्यावली, आरल्डी, योकच काला जाला सारा
आमीबी लई रल्डो, लई गागलो, पन हाय कोन वाली ?
मायबाप इट्टलानंच आस्पृश्य केलं हाय्
तुम्ही मान्सं काय न्याव देन्नार हायसा सायब ?

## शामकी बेला

शाम की बेला
पंछी अकेला
हृदयात हुरहूर
रितेपणाची

ही ढळती सांज
लालचुटूक ओठ नाहीत
लोभस उभार उरोज नाहीत
फक्त पोटात आग नि
डोळ्यासमोर वासलेल्या चोची

घाबरू नकोस जिवा
ती बघ आगगाडी
सुसाट धावत येते आहे
काळजातली कळ तुडवायला
हो पुढे-
सामोरी.

ऊन

दरदिवशी तापतंय अधिकच
भेदतंय ऊन आयुष्याला
एकेक पाकळी उतरवीत
पुन्हा सामोरं व्हायचं
ताजं टवटवीत !
बेफाम कोसळणाऱ्या धबधब्याकडे
आवेगानं झेपावणाऱ्या बेलगाम प्रवाहात
एकादाच लोटून दिलं स्वत:ला...
प्रकाशपृथक्करणाचा कोन साधेल का कधी तरी ?
की पुन्हा तसेच वहात जाणे...

## अनोळख

अशक्त पहाट
निरंगी वेचव प्रकाश आरपार भरून राहिलेला
फुलं फुलूनही जागी नाहीत
कदाचित त्यांचं हे निजेचं ढोंग असेल–कुणाला निववण्यासाठी
गाई, गुरं, पक्षी, माड मात्र खरोखरीचीच अबोल
थेंब थेंब पीत राहूनही धरित्रीचा सर्वनाशी शोष
पावसाच्या धूसर रेषा नाहीशा होत जातात आणि
दृष्टीत उसळून येतं भलतंच काही ...

वाळलेल्या गवताचा विस्तीर्ण माळ, निळभोर आभाळ, अपरंपार पोकळी
माळावर, रक्ताचे ओघळ सुकून गेलेले, तिने रिचवलेले
चौफेर विखुरलेल्या चिंध्याचिंध्या अनेकानेक निशाणांच्या
कानाशी येतात, दिशांतून दाबून ठेवलेले उसासे
पिचलेल्या बांगड्यांचे नाद विरत गेलेले
तनमन बधीरणारा वायू ओढून घेतो कवेत
‘ नको नको ’ चा दुर्बल प्रतिकार आणि
संज्ञाहीन गर्ता खोल ...

पायाखालच्या वाटा, लाटा, स्फुंदत होतात दूर
सर्वत्र शिंपल्या–मोत्यांचा अभद्र चूर
पुनश्च उघडा पडलेला कुरूप किनारा आणि
निरंगी बेचव प्रकाश
किनाऱ्यावर वाहून आलेल्या प्रेतांची ओळख
कुणालाही न पटणारी

## या चांदण्यात

तू अंधारात उभी आहेस, गजांआड,
तरीही तुझं लख्ख हसू अंगावर सांडत आहे माझ्या, चांदण्यासारखं
थट्टेनं म्हणायचीस, ‘फार रसरशीत दिसतेस,
आता पुरे–लठ्ठ होशील, बुद्दू,
सुखात लडबडू नकोस अशी–मधातल्या माशीसारखी’
खरं तुझं अगदी–
कुण्या एकाची मर्जी राखता राखता
सगळ्या जगाचा एक चेंडू बनवून टाकला त्यांनी
आणि मग त्यांचा स्वतःचाच सुंदर गोल गरगरीत चेंडू बनून गेला...
पण माझ्यासाठी जग जरादेखील आक्रसलं नाही ग,
सतत विस्तारतच राहिलं–
पण विलक्षण कंटाळा भरून राहिला त्यात

आपल्या सभांना बायका आल्या नाहीत की माझे डोळे भरायचे
पण तुझं आपलं तिसरंच : सभा घेतो म्हणजे उपकार नाही करत त्यांच्यावर
आपण आपली पापं घासून कमी करत असतो सहाणेवर !
अगदी पापं जाऊ देत - पण या आपल्या जन्मखोडी–
लागेल, कधीतरी सहाणेलाही झीज लागेल...
पण मला धीर नव्हताच कधी.
माझी आपली बावणाऱ्या फुलांची पूजा - पापविमोचनासाठी
सडत सडत जाणारी...
आता पुन्हा अंधार, अंधार घेरतो मला - कंटाळलेला स्वतःच

दुरून तुझं हसू सांडतंय अजून, गजांआडून
तरीही काहीसुद्धा खुलत नाही या चांदण्यात...

## एक आपण असतो

एक आपण असतो
कसे कसे घडत आलेलो
भोवतालीही कुणी कुणी किती तरी
तेही घडत असतानाच
आणि शिवाय म्हणजे ते घडवीतही असतात काही काही
बघता बघता पांगत जातात
काही वेळा जवळही येतात हवे तेवढेच किंवा नको तेवढेही

हे सगळं होत असतानाच
कळत जाते दरवेळी नवनवीनच
आणि असेही वाटून जाते मधेच वावदुकपणे
चक्क आपणही काहीतरी घडवले आहे घडवीतही आहोत
मग तर आपले सारखेच वाटत रहाते, आभाळभर
बदलत रहाणाऱ्या ढगांसारखे फुलारफुलार

खरे तर असेही वाटायला हवे कधीतरी की
शोभादर्शकातल्या नळकांड्यातल्या बदलत रहाणाऱ्या
काचाचित्रांसारखेच आहे हे सारे
आपण फक्त फुटक्या काचा

## स्वीकार

टपटपत येणाऱ्या क्षणांचा
लूत भरल्या कुत्र्याच्या भिजलेपणाचा
विनम्र स्वीकार
हिंमतीच्या अभावातून समर्थपणे पेललेला !

आभाळातही अभावानंच असलेल्या मेघावलीतून
बरसत आहे अपरंपार निरंतर मौनच मौन
मनाच्या या चिरफळ्यांमधून
झिरपून तरी काय काय जाणार ?

बरंय् मग हे चंदेरी घर
स्वतःतूनच ओढून काढलेल्या धाग्यांचं
भक्ष्यासाठी आणि यथावकाश कालभक्ष्य होण्यासाठी

आता डोळेही भरू द्यायचे नाहीत निश्चयपूर्वक

## सनातन शहाणपण

कर्कश्श शीळ फोडून
एकदा आगगाडी स्टेशनावरून धडाडत अदृष्यात मिटून गेली की
आतल्यांना काचून टाकणारे सारे पीळ सैलावत जातात? इतके?
काळा धूर आभाळात निळा होऊन जावा इतक्या सहजगतीने
संवादहीन होऊन जातात मने?

मग का हे डोळे वेळी अवेळी गळत रहातात?
एकाकी क्षणांची प्रदीर्घ मालिका तगमगणारी...
स्वतःलाही वाचणे अशक्य होऊन जावे अशी धूसर दृष्टी
वर्तमानाचा प्रत्यय नसतो, भविष्याची शाश्वतीच नसते थेंबभरदेखील
जगून गेलेल्या क्षणांचाच पुनःप्रत्यय, तसाच उत्कट, सदाबहार

त्यातूनच हा न संपणारा काळानिळा कंठशोष
त्याच त्या गहन प्रश्नांची एकातून एक निनादत सुटणारी आवर्तने

हे गळणारे डोळे खुडून घ्यायला
गतकालातून तू धावून का येत नाहीस या क्षणी?

पाखले सरताहेत, या सरणाऱ्या वाळूवरून
यावेळीच पंखांवर केवढा अंधार तोलून आहेस तू !

तरीही
ऐकायचं नाहीय ते सनातन शहाणपण मला
माणसं म्हातारी होत जातात वा मरूनही जातात याचं दुःख नाही
दुःखान्तिका हीच असते की माणसं प्रेम करायचंच विसरून जातात

हे समजून तू घे न जरा...

## मैत्रिणी ग....

उजाडता उजाडताच
गुलाबी ढगांवर
लिहून टाकलं एक हसरं पत्र
आणि मग जास्वंदीच्या फुलावर
ताजा कलम

लगेचच पुन्हा लिहावं लागलं दुसरं
जमून आलेल्या चहाच्या मस्त वाफेवर
वर्तमानपत्रातल्या 'त्या' बातम्या
डोळ्यात घुसताना

तिसऱ्याला विलंब झाला जरा
अपरिहार्यपणेच अर्थात् – म्हणजेच
नेहमीसारखाच तुझ्या मते !

ते तिसरं पत्र माध्यान्ही
अळूवडी होती डब्यात
आणि सोबतीला 'कविता'
तेव्हा लिहून झालं थोडं काही
मनापासून मनासारखं

मग दिवसभरातली काही पत्रे
अशीतशीच भराभरा
गाडी पकडताना तोल गेला तेव्हादेखील
आभाराचं, लघुपत्र

संध्याकाळ मालवताना मात्र
उन्मळून आलं सारं अनाथ... पोरकेपण
आभाळ हलवून सोडावं वाटलं गदागदा
टपाटपा चांदण्या कोसळण्याइतकं

वाचशील का कधी – एखाद्या रात्री – आभाळभर विखुरलेली–
माझी मनपत्रं ?

## आभासराई

या दिवसरात्री
फडफडताहेत पाठोपाठ उलटत जाणाऱ्या पुस्तकातल्या पानांसारख्या
फडफडताहेत वेगवेगळ्या कोनांमधून या पृथ्वीगोलावर
खरीच वाटत नाही ही यांची उघडझाप
समजतच नाहीय की मी म्हणजे तरी काय नि बोलतेय ते कुणाशी
ही अक्षरे तर माझीच
पण झाली आहेत एक लांबलचक रेलगाडी
रेलगाडी सुटलीय सुसाट धावत कर्कश्श किंचाळत
दऱ्यापुलांवरून नि अंधाऱ्या बोगद्यांमधून
भांबावून भोवळून जाते आहे मी
जबरदस्तीने ओढून काढतंय मला खिडकीतून कुणी
भिरकावून देतय् थेट, गरगरणाऱ्या भयाण भोवऱ्यात
खोलखोल खेचून नेणारं तळाकडे
कसलं हे महाप्रचंड गुरुत्वाकर्षण ?
...
एक चिमुकलं बाळ
मुठी चोखत पिंपळपानावर
झाडांच्या पानातून टुकूटुकू आकाश पहाणारं
केवढं बाई हे आभाळ तरी–कां हे तर नुसते तुकडे तुकडेच ?
आणि एवढयात हा प्रचंड धबधबा कोसळतोय ढगातून...

बाळाच्याच अंगावर...
बाळ गद्गदतंय, धडपडतंय, रडतंय केविलवाणं
बाळ धडपडतंय, पहातंय चिमुकल्या मुठीत कुठला पदर पकडायला
काही...काही उपयोग नाही...
बाळ घुसमटतंय्, गुद्मरतंय्, चाललय वहात पाणलोटावर...
...
आणि ही आता बघतेय् मी मला तर उभी आपली काठावर मी
चक्क सुक्षेम...सुखरूप...
आणि समोर ही लांबलचक नदीच नदी गोठून उभी राहिलेली !
अरे...! क्षणार्धात पुन्हा आवेगाने जिवापाड धावत सुटलेली...
हिसकावून घेतेय धसाधसा माझ्या मनातून माझी प्रतिबिम्बे
माझी प्रतिबिम्बे वाहून जाताहेत
त्यातून मीही वाहून गेलेय की काय थोडी थोडी ?
...
तर ही उरलेली मी...
मी कोण आहे खरी ?
हे माझं मन तरी काय आहे ?

हे माझं शरीर...
मन फुलवणारं
आणि पुन्हा मनातून स्वतः फुलून येणारं
काय काय सोसणारं ?

हे सारं कितीकाळ, किती वर्षं, किती क्षण चालणार आहे ?
तरी तसं सोपंच म्हणजे मातीतच मिळणार आहे
पण मग हे मन जे हवेसारखं, न कळणारं, अती अती छळणारं
काय होणार त्याचं मग हे शरीर मातीत गेल्यावर ?
...
हे सगळं काय आहे डोळ्यांना या दिसणारं ?
आणखी किती शिल्लक आहे तर्कापल्याड उरणारं ?
हे डोळे तरी कसले आहेत ? कसली समोर आभासराई
ही सारी वृक्षराई की लाटाच साऱ्या पाण्याच्या ?
पर्वतप्राय या लाटाच पुन्हा ... नवे ... नवे ... रक्तलोट

अंतरंग

भिऊ भिऊ केलेली कुजबूज नव्हे ही तुमच्या कानांशी
हे आहे खूप सारं दाटून आलेलं
ऊर्मीसरशी परतून आलेले हे माझे काही अंत ...
आसुसून फुलून आलेले गडद फिके रंग ...

खरं तर खूप खाजगी ... म्हणजे
तशी वैयक्तिकच कुणाचीही कविता – तिचे प्रत्यय
एकट्यापुरताच तर असतो साक्षात् निसर्गाचा संग आणि
सामाजिक प्राण्यांचं एकाकीपणही ... त्यांच्यापुरतंच
हृदयाहृदयांमधले पूल उभारताना
सततच वाहून जात असतात पायाभूत पिलर्स
...अगदी गर्भाशयांमधले जिवंत बळी देऊनही

तरीही
प्राजक्तजुईंच्या सुगंधसेतूंचा अनावर आठव
एकहृदय होऊन म्हटलेली समरगीते
घायाळांसाठीचं घायाळपण...
अद्भूताच्या स्पर्शांनी छेडलेली सहकंपने

कृत्रिम... खोटंही वाटू शकतं हे सारं आपल्याला आत्ता
पण तरीही गॅसचेंबरमध्ये मरत राहिल्यासारखं
घुसमटत जगायचं नाहीये मला हे नक्कीच
मनभरून गायचं आहे डोंगर दऱ्यांतून
नाचायचंय् मनमुराद खळाळणाऱ्या प्रवाहांमधून
वहायचंय तुम्हा साऱ्यासाऱ्यांबरोबर
म्हणून तर हे शब्द... या कविता...
आपल्याला सांभाळणाऱ्या
...की फसवणाऱ्या ?

REFBK-0024040
REFBK-0024040

जिवंत देहाचं आणि जिवंत मनाचं
माणूसपण म्हणजे संवेदनांचा कल्लोळ.
ज्या काळात जगण्यातली गुंतागुंत वाढतेय
आणि माणूसपणच हरवू पाहतंय
त्या आजच्या काळात कोसळणाऱ्या,
तडे जाणाऱ्या, घुसमटणाऱ्या जीवनाचा तोल
सांभाळण्याची आणि जगण्याची ओढ
टिकवण्याची शक्ती स्त्रीमधेच आहे
असा प्रत्यय उषा मेहतांची कविता
वाचताना वारंवार येतो.
निसर्गाशी असलेलं स्त्रीचं उत्कट आणि थेट
नातं त्यांची कविता विलक्षण
लवचिकपणे व्यक्त करते.
फार प्रचंड आवाका किंवा विचार यांचा
आव न आणता मनाचे साधेच
पण फार महत्वाचे आणि खरेखुरे रंग
त्यांच्या कवितेचा सहजभाव आहे.
आणि जगण्यावरचे खोटे रंग धारदारपणे
पुसून आतल्या व्यामिश्र अनुभूतींचा
तीव्र वेध घेण्याचं सामर्थ्य
तिच्यात आहे.

